Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV04V12P0009

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–III(IV), Volume–XII

# राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांची भूमिका

**Dr. Anjali Anand choure**
Librarian, Uma Mahavidyalaya, Pandharpur
Email : badweanjali@gmail.com

**गोषवारा :**

कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शिक्षण धोरणावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, विकासाची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहत असते. त्यामुळे शिक्षण धोरण आखताना ते भविष्यवेधी असायला हवे. शिक्षण धोरण म्हणजे त्या देशाच्या भविष्याची, विकासाची दिशा असते. प्रस्तुत लेखांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 या शैक्षणिक धोरणाबद्दल सविस्तर माहिती दिली असून सदर धोरणाच्या अनुषंगाने महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या बदललेल्या भूमिकेबद्दल आणि शिक्षण प्रक्रियेमधील महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या भूमिकेबद्दल सविस्तर चर्चा केली आहे.

**महत्त्वाच्या संज्ञा :** राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, NEP महाविद्यालयीन ग्रंथालय.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 हे भारत सरकारने 21 व्या शतकातील जाहीर केलेले पहिले शिक्षण धोरण आहे. 1984 च्या धोरणानंतर 34 वर्षांनी नवीन शैक्षणिक धोरण आले आहे. डॉ.के. कस्तुरीरंगन आयोगाने मनुष्यबळ विकास मंत्रालयास सादर केलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2019 या अहवालावर बेतलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 - 29 जुलै 2020 मध्ये लागू करण्यात आले. हे धोरण शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, विचार करण्यासारखे इतर महत्त्वाचे केंद्रीय मुद्दे आणि अंमलबजावणी अशा चार भागात विभागलेले आहे, हे धोरण देशाच्या शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल करणारे असून ते 2040 पर्यंत पूर्णपणे अमलात आणले जाणार आहे.

प्रचलित शिक्षण व्यवस्थेत खूप मोठ्या प्रमाणात बदल करण्याचे या धोरणात निश्चित केले आहे. शालेय शिक्षणाचे 10+2+3 हे प्रारूप बदलून त्या ऐवजी 5+3+3+4 हे प्रारूप स्वीकारले आहे. अभ्यासक्रम व्यवस्थापन अध्ययन अध्यापन मूल्यांकन शिक्षणाचे नियमन आणि संस्थात्मक मूल्यमापन आणि मूल्यांकन यात बदल सुचवले आहेत. उच्च शिक्षणाची प्रचलित संस्थात्मक रचना हे शिक्षण धोरण पूर्णार्थने नाकारते बहुशाखिय शिक्षण पद्धतीचा स्वीकार संशोधनास प्राधान्य उच्च शिक्षण नियमक संस्थांची पुनर्रचना ही या धोरणाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत, प्रेरित उत्साही आणि सक्षम शिक्षक शिक्षणातील महत्वाचा घटक असतो याची दखलही या धोरणात घेतली आहे.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2411IV04V12P0009

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील विशेष कौशल्याची गरज नसणारी कामे आता माणसांऐवजी यंत्रे करू शकतील, राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 मध्ये सुचवलेल्या आमुलाग्र शैक्षणिक धोरणा बरोबरच शालेय स्तरापासून उच्च शिक्षण स्तरापर्यंत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत. बहुविद्याशाखीय शिक्षण, ऑनलाइन शिक्षण, संशोधन आणि विकास कौशल्य आधारित शिक्षण असे अनेक बदल सांगितले आहेत, ह्या बदलामुळे ग्रंथालयाचे शिक्षणातील महत्त्व स्पष्ट होते.

**उद्दिष्टे :**

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची सविस्तर माहिती देणे.
2. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये ग्रंथालयाची बदलती भूमिका याबद्दल सविस्तर माहिती देणे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 मधील उच्च शिक्षण धोरणांचे गुण वैशिष्ट्ये :**

1. बाल वयोगटातील मुलांसाठी (वय वर्ष 3 ते 6) अनिवार्य शिक्षण
2. प्राथमिक ते इयत्ता बारावी पर्यंत शिक्षणाच्या सर्व स्तरांपर्यंत शिक्षणासाठी सार्वत्रिक प्रवेश
3. इयत्ता पाचवी पर्यंत मातृभाषा/ स्थानिक भाषा/ प्रादेशिक भाषा मधून शिक्षणास प्राधान्य
4. विद्यार्थी केंद्रित धोरण
5. शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट ची स्थापना
6. बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे (MREUS) ची स्थापना करणे
7. संशोधन आणि विकासासाठी राष्ट्रीय संशोधन संस्था (NRF) स्थापन करणे
8. खुल्या आणि दुरस्थ शिक्षणासाठी केंद्रांचा विस्तार करणे
9. उच्च शिक्षण व्यवस्थेत व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देणे
10. मूल्यांकन सुधारणा करणे
11. शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा व्यापक वापर आणि एकात्मिकरण
12. ऑनलाइन आणि डिजिटल शिक्षण : तंत्रज्ञानाचा समान वापर सुनिश्चित करणे
13. सर्वांना परवडणारे शिक्षण
14. न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण
15. शालेय शिक्षणाची मानक प्रस्थापणे आणि मान्यता

16. बहुविद्याशाखीय शिक्षण
17. शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण
18. परदेशी विद्यापीठांना मान्यता
19. उच्च शिक्षण संस्थांमध्ये राष्ट्रीय डिजिटल ग्रंथालय ऑफ इंडिया (NDLI) ची स्थापना

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण NEP 2020 आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांची भूमिका :**

**1. शिक्षण आणि संशोधन केंद्र म्हणून विकसित होणे:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्टे उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण 26.3% (2018) वरून 2035 पर्यंत 50% पर्यंत वाढवण्याचे आहे. हे नोंदणी प्रमाण वाढवण्यासाठी शिक्षणाच्या एकत्रीकरणावर भर देते. हे उद्दिष्ट साधण्यासाठी सर्व प्रकारच्या वापरकर्त्यांसाठी सुलभ प्रवेश आणि उपलब्धता सुनिश्चित करावी लागेल. तसेच ग्रंथालयांना पुरेशी आणि नवीनतम अभ्यास आणि वाचन संसाधने व ग्रंथालय सेवा आणि सुविधांवर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे.

**2. आकर्षक शिक्षण साहित्याचा विकास:**

नवीन 2020 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी स्थानिक आणि भारतीय भाषांमध्ये मानक सामग्रीसह पुस्तके विकसित करणेए आवश्यक आहे. पुस्तकांचा दर्जा आणि आकर्षकता सुधारण्यासाठी धोरणात्मकपणे काम करणे गरजेचे आहे. NEP 2020 मध्ये समाजाच्या वाचकांसाठी तसेच शिक्षकांसाठी नवीन अभ्यासक्रमानुसार प्रगत आणि नवीनतम संसाधनांसाठी तरतुदी आहेत. ग्रंथालयांवर धोरणात्मक लक्ष कमी दिसत आहे. परंतु तरीही, ग्रंथालयातील बाबी स्पष्टपणे दिसल्या पाहिजेत.

**3. ग्रंथालयांमध्ये पुस्तकांचे उपलब्धता आणि सुलभता सुनिश्चित करणे :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने दर्जेदार शिक्षण आणि संशोधन विकासासाठी वाचकांसाठी दर्जेदार पुस्तके आणि संसाधनांची उपलब्धता आणि सुलभता यावर लक्ष केंद्रित केले आहे. अपंग व्यक्ती आणि इतर भिन्न - अपंग व्यक्तींसह समाजातील विविध आणि विशेष प्रकारच्या वाचकांसाठी पुस्तके आणि संसाधने उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. धोरण शिफारस करते की सर्व समुदाय, संस्था आणि शैक्षणिक संस्था. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे आणि सार्वजनिक ग्रंथालये - सर्व विद्यार्थ्यांच्या गरजा आणि आवडी पूर्ण करणाऱ्या पुस्तकांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी बळकट आणि आधुनिकीकरण केले जाईल.

**4. देशभरात वाचनाच्या सवयीला प्रोत्साहन :**

वाचक संख्या वाढवण्यासाठी सार्वजनिक आणि शालेय ग्रंथालय मोठ्या प्रमाणात वाढविण्याची गरज आहे. वाचनाची सवय वाढवण्यासाठी बुक क्लबची सुविधा विकसित केली जाईल. वाचन संसाधने व ग्रंथालय सेवा सुविधांवर अधिक भर देणे गरजेचे आहे.

**5. ऑनलाइन संसाधने आणि डिजिटल ग्रंथालयांसाठी तरतूद :**

NEP 2020 मध्ये डिजिटल ग्रंथालयांसाठी ऑनलाइन संसाधनांची तरतूद आहे आणि ग्रंथालय पुस्तकांची ऑनलाइन सुलभता आणि डिजिटल ग्रंथालयांचा अधिक व्यापक वापर वाढवण्यासाठी पावले उचलली जातील. विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी विशेषतः खेड्यांमध्ये शाळा नसलेल्या वेळेत, येत्या काही वर्षात ICT सुसज्ज शाळा / सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना केली जाईल.

**6. ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी योग्य निरंतर शिक्षण:**

सर्व प्रकारच्या वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, ग्रंथालय सेवा. सुविधा निर्माण कराव्या लागतील, तसेच त्या विकसित करणे, त्यामध्ये वाढ करणे आणि त्यांच्या वाचनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य कर्मचारी वर्ग सो निश्चित केला जाईल. या कर्मचाऱ्यांना वेळोवेळी योग्य प्रशिक्षण दिले जाईल, जेणेकरून नवनवीन आव्हानांना ग्रंथालय कर्मचारी सामोरी जाऊ शकतील.

**7. ग्रंथालयांमध्ये ग्रंथेतर साहित्याची उपलब्धता आणि तंत्रज्ञानाचा वापर:**

धोरण सुचित करते की वरील उपक्रमांना बळकट करण्यासाठी ग्रंथालयामध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. प्रौढ शिक्षणासाठी दर्जेदार तंत्रज्ञान. आधारित पर्याय जसे की ॲप्स, ऑनलाइन अभ्यासक्रम, मॉड्यूल, ऑनलाइन पुस्तके, डिजिटल संसाधने आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञान. सुसज्ज ग्रंथालय आणि प्रौढ शिक्षण केंद्रांचा वापर केला जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) सर्व विद्यमान ग्रंथालयांना बळकट करत आहे. NEP 2020 मध्ये डिजिटल जगात सर्व स्तरांवर ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्व प्रकारच्या तरतुदी आहेत. सध्याच्या आधुनिक डिजिटल युगात, हे स्पष्ट आहे की ग्रंथालये संशोधन आणि शैक्षणिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील, ग्रंथालय दर्जेदार शिक्षण आणि राष्ट्राच्या प्रगतीचे योग्य मार्ग प्रदान करतील.

**8. माहिती साक्षरता :**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार ग्रंथालये माहिती साक्षरतेच्या कार्यक्रमाद्वारे माहिती शोधण्याची आणि मूल्यांकन करण्याची कौशल्य शिकवतात.

**निष्कर्ष :**

NEP 2020 च्या दिशानिर्देशांचे पालन करून महाविद्यालय ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक गरजांसाठी एक मजबूत आधार बनू शकतात. यामुळे शिक्षणा क्षेत्रात गुणात्मक सुधारणा

होईल आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम बनवेलण् बहुविद्याशाखीय शिक्षण घेण्याची उच्च शिक्षणातील तरतूद विद्यार्थ्यांना आनंददायी आणि आवडीचे शिक्षण घेण्याची मुभा देते. NEP 2020 मध्ये शिक्षणाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याची जबाबदारी ग्रंथालयांवर सोपवली आहे.

**संदर्भ :**


1. विभुते भालबा. "राष्ट्रीय शिक्षण धोरण, 2020" पुणे, मेहता पब्लिकेशन 2022 - पृष्ठ 1.3
2. Government of India (2020) : National Education Policy 2020
3. नाईक बी.एम. "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020" चे अंतरंगरू संशोधन, नाविन्यपूर्णता आणि उद्यमशीलता औरंगाबाद विद्या बुक पब्लिशर्स 2023
4. गायकवाड मनीषा खंडू. 2023 - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि ग्रंथालयांची भूमिका "लायब्ररी स्कॉलर खंड 3 क्रमांक 1 मार्च 2023 पृष्ठ 10.12
5. Chaudhari, Yashwant S. NATIONAL EDUCATION POLICY 2020 AND CHANGING ROLE OF LIBRARIES - 2023). Library Philosophy and Practice (e-journal). 7860.
6. Sumadevi S. Impact of NEP 2020 on the Role of Academic Librarians in Higher Educational Institutions
7. Conference Paper: November 2023. https://www.researchgate.net / publication